# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
**१७, डॉ.आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१**

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/शिवस्वराज्य दिन/२०२२/**१५४९** दि.०३-०६-२०२२

**महत्वाचे/ई-मेलद्वारे**

प्रति,
कुलसचिव/संचालक,

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, संबंधित विद्यापीठे
३) गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
४) डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
५) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
६) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
७) कुलसचिव/संचालक, सर्व स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे, पुणे
८) प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वायत्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये प्राचार्य तसेच वसतिगृहे व परिसंस्था प्रमुख, पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- **दिनांक ६ जून हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करणेबाबत...**

संदर्भ:- १) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३०/विशि-५, दि.०३-०६-२०२१.
२) मा.संचालनालयाकडील क्र.शिस्वदि-०४२१/प्र.क्र.०२/मवि-१/५४३७, दि.१९-५-२०२२, दि.२४-५-२०२२ व दि.०१-०६-२०२२.
३) या कार्यालयाकडील समपत्र क्र.१४४७, दि.२०-५-२०२२.
४) मा.संचालनालयाकडील क्र.शिस्वदि-०४२१/प्र.क्र.०२/मवि-१/६०९१, दि.०३-०६-२०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये शिवस्वराज्य दिन साजरा करण्याबाबत यापुर्वी अवगत करण्यात आलेले आहे.

सदरचा कार्यक्रम राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने **सोमवार, दि.०६ जून, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता सातारा** येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार आपल्या विद्यापीठामध्ये तसेच संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा व अध्यापकांचा जास्तीत जास्त सहभाग राहील याची दक्षता घ्यावी.

दि.०६ जून, २०२२ रोजी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने **शिवस्वराज्य दिन** साजरा हा कार्यक्रम खालील लिंवर पाहण्यासाठी उपलब्ध होणार आहे.

युटयूब: https://youtu.be/5edKuStbx4Y

फेसबूक: https://fb.me/e/1N7QsgOVg

सदरची लिंक आपल्या विद्यापीठ / महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांचेमार्फत विद्यापीठे व महाविद्यालयातील अध्यापक / अध्यापकेतर, सर्व विद्यार्थ्यांना पुरविण्यात यावी.

महाविद्यालयामध्ये सदरचा कार्यक्रम सर्व विद्यार्थ्यांना एका छताखाली प्रक्षेपित होईल यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. या उपक्रमासाठी किती अध्यापक, अध्यापकेतर व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला याबाबतची माहिती खालील तक्त्यात तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी.

| अ.क्र. | महाविद्यालयांची संख्या | सहभागी अध्यापक / अध्यापकेतर कर्मचारी | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

उक्त कार्यक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होण्यासाठी आपल्यास्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावे.

तसेच सर्व विद्यापीठांना कळविण्यात येते की, दिनांक ०६ जून रोजी झालेल्या कार्यक्रमाचे निवडक फोटो, व्हिडीओ तसेच लेख या कार्यालयाच्या admin@jdhepune.info या ई-मेलवर त्यांचेशी संलग्नित महाविद्यालयांच्या व विद्यापीठाच्या कार्यपूर्ती अहवालासह संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव तसेच कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांनी एकत्रित करुन चार दिवसात पाठवावेत.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

प्रत:- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.